सन २०१९-२० करीता आदिम जमाती विकास कार्यक्रम योजनेअंतर्गत प्राप्त निधी वितरणास मान्यता व कार्यारंभ आदेश देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः केंद्रिय-२०१९/प्र.क्र.६३/का.-१९**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २३/०७/२०१९

**वाचा -**

१. जनजाती कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०१/२०१९-Grants, दि.११/०३/२०१९.
२. आदिवासी विकास विभाग ,शासन निर्णय क्र. केंद्रिय-२०१९/प्र.क्र.६३/का.-१९,दि.२८.०६.२०१९
३. जनजाती कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०४(१९)/२०१९/PVTG, दि.०९/०६/२०१९
४. जनजाती कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०४(१९)/२०१९/PVTG, दि.०९/०७/२०१९

**प्रस्तावना -**

केंद्र शासनास सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता आदिम जमाती विकास कार्यक्रम अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात आले होते. सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली येथे प्रकल्प मुल्यमापन समितीची (Project Appraisal Committee-PAC) बैठक दि.१२/०२/२०१९ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीच्या वाचा क्र. १ वरील इतिवृत्तान्वये केंद्र शासनाने एकुण रु. १५१०.०० लक्ष निधीच्या प्रस्तावांना मान्यता प्रदान केलेली आहे. यापैकी केंद्र शासनाने यापूर्वी वितरित केलेला रु.५०३.३३ लक्ष निधी वाचा क्र.२ वरील शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आलेला आहेत. केंद्र शासनाने वाचा क्र. ३ व ४ वरील पत्रांन्वये वितरीत केलेला ६२९.१७ लक्ष इतका निधी राज्य शासनाच्या एकत्रित निधीत जमा झाल्याचे वित्त विभागाने प्रमाणित केले असल्याने प्रस्तुत निधी आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय (Government resolution)-**

केंद्र शासनाने सन २०१९-२० करिता आदिम जमाती विकास कार्यक्रम योजनेअंतर्गत मंजूर केलेल्या एकूण रु. १५१०.०० लक्ष (रु. पंधरा कोटी दहा लक्ष रूपये फक्त) इतक्या निधीतुन पुढील कामांकरीता तालिकेत स्तंभ क्र. ५ मध्ये दर्शविलेल्या निधीच्या मर्यादेत खर्च करण्यास याद्वारे शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं | योजनेचे नाव | योजनेचे ठिकाण/योजना राबविणारी यंत्रणा (PO/ATC/संस्था) | सन २०१९-२० करिता मंजूर निधी (रु. लाखात) | वितरीत करण्यात येणारा निधी (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|
| | | New Project | | |
| १ | Department of Anthropology, Wardha - Maternal and Child health status of PVTG (Kolam and Madia ; ५०० beneficiaries) | TRTI /Department of Anthropology Wardha / Gadchiroli and Yawatmal | १५.०० | ६.२५ |
| २ | Gramsabha Channabodi - Sustainable livelihood generation for forest dwelling ST tribes (PVTG-Madia) by community based forest management, harvesting and processing.(~२२०) | PO ITDP Aheri/ Gramsabha Channabodi (Jawawandi Etapalli | ३६.३२ | १५.१३ |
| ३ | Manipal Academy of Higher Edication - Control the population decline among PVTG groups (Palghar and Raighar) through maternal and child health and nutrition intervention (१५००० beneficiaries) | TRTI / Manipal Academy of Higher Education | २९.९८ | १२.४९ |
| ४ | EAGL - Goat rearing intervention for Katkari tribes. | Commissionerate/PO ITDP Shahapur, Ghodegaon, Pen / EAGL | ५२७.०० | २१९.५८ |
| ५ | Financial support for the Primitive trible girls from ११th to १२th in the educational stream (PO ITDP Kinwat) | Po ITDP Kinwat | २.४० | ०१.०० |
| ६ | Provide ingredients to the anganwadi in Primitive Pada (PO ITDP Kinwat) | Po ITDP Kinwat | ६.८८ | २.८७ |
| ७ | Water Purifier set for primitive pada (१ Unit) | Po ITDP Kinwat | ४.२७ | १.७८ |
| ८ | Flour mill (PO ITDP Kinwat) | Po ITDP Kinwat | ३.०० | १.२५ |
| ९ | Evalution of Scheme Project officer, kinwat ('Monitaring and Evalution) (PO ITDP Kinwat) | Po ITDP Kinwat | २.१४ | ०.८९ |
| १० | Net of Fishries (PO ITDP Pen) | PO ITDP Pen | १०.०० | ४.१७ |
| ११ | Digitizing of data and planning for PVTG | TRTI | ५००.०० | २०८.३३ |

| अ.नं | योजनेचे नाव | योजनेचे ठिकाण/योजना राबविणारी यंत्रणा (PO/ATC/संस्था) | सन २०१९- २० करिता मंजूर निधी (रु. लाखात) | वितरीत करण्यात येणारा निधी (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|
| १२ | DharaMitra- Developing livelihood oppurtunities of Kolam community through improved practices of backyard poultry and goat rearing | Commissionerate/Dhara Mitra | ९८.५६ | ४१.०७ |
| १३ | Devrai art village - training at Bhamragad | PO ITDP Bhamaragad/ Devrai Art Village | ४५.१६ | १८.८२ |
| १४ | Financial Inclusion through Banking Correspondednt model by equiping २२० Bank sakhis selected by District adminstration with Micro ATMs. (Collector Office Gadchiroli) | PO ITDP Gadchiroli and Collector office Gadchiroli | १००.२७ | ४१.७८ |
| १५ | Creation of PVTG cell for targeted intervention | TRTI | १००.०० | ४१.६७ |
| १६ | Monitoring and Evaluation | Commissionerate/TRTI | २९.०२ | १२.०९ |
| Total | | | १५१०.०० | ६२९.१७ |

२. उपरोक्त ६२९.१७ लक्ष निधीचा खर्च मागणी क्र. टी-५, मुख्य लेखाशीर्ष २२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - ०२ - अनुसूचित जमातीचे कल्याण - ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (४०) आदिम जमातीच्या विकासासाठी केंद्रीय क्षेत्र योजना अन्वये केंद्रीय सहाय्य, ३१ सहायक अनुदाने (२२२५ ३००१) (वेतनेतर) यामधील सन २०१९-२० मध्ये अर्थसंकल्पित असलेल्या निधीतून करण्यात यावा.

३. सदर निधी अर्थसंकल्पिय अंदाज वितरण व संनियंत्रण प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आला आहे. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी वितरीत निधीच्या मर्यादेत निधी तातडीने आहरीत करण्याची दक्षता घ्यावी व संबंधित अपर आयुक्त,आदिवासी विकास / प्रकल्प अधिकारी ,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प /योजना अंमलबजावणी करणारी यंत्रणा यांना वितरित करावा.

४. सन २०१९-२० या वर्षामधील केंद्र शासनाकडुन संदर्भ क्र.१ कडील पत्रान्वये मंजुर योजनांपैकी अ.क्र.१,३,४,११,१२ व १५ वरील योजनांची मार्गदर्शक तत्वे शासन/आयुक्तालय/आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांच्या स्तरावरुन निर्गमित करण्यात येतील. उर्वरित योजनांसाठी अपर आयुक्त/प्रकल्प अधिकारी यांनी शासन निर्णय दि.२२.१२.२०१७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार योजनेच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचना निर्गमित करुन रुपरेषा तयार करणे, लाभार्थी निश्चित करणे,मुल्यमापन व

आढ़ावा घेणे इ. बाबींसाठी कार्यपद्धती निश्चित करावी.या योजनांसाठी प्रशासकीय मान्यता/मार्गदर्शक तत्वे निर्गमित करून योजनांची अंमलबजावणी तातडीने सुरु करण्याची जबाबदारी संबंधित अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांची राहील.

५. केंद्र शासनाकडुन मंजुर सर्व योजनांचा मासिक प्रगती अहवाल संबंधित अपर आयुक्त/प्रकल्प अधिकारी यांच्याकडुन प्राप्त करुन घेवुन दरमहा १० तारखेच्या आत शासनास सादर करणे व कार्यान्वित असलेल्या योजनांसंदर्भात पुढील निधी संबंधितांना वितरित करण्यापुर्वी त्या योजनेचा आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल व झालेल्या खर्चाबाबत उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी आयुक्त,आदिवासी विकास , नाशिक यांची राहील.

६. ज्या योजना संबंधित प्रकल्प अधिका-यांच्या कार्यक्षेत्रात राबविल्या जातील त्या योजनांच्या लाभार्थ्यांची यादी व Geo-tagged photographs हे www.stcmis.gov.in/smis या वेबसाईटवर व Central Assistance Sceme (CAS) पोर्टलवर अपलोड करावेत. प्रकल्प राबविल्याबाबतचा आवश्यक दस्ताऐवज संबंधित प्रकल्प अधिका-यांमार्फत ठेवण्यात येवून तो योग्य प्रकारे जतन केला जाईल याची दक्षता संबंधित प्रकल्प अधिकारी यांच्याकडून घेण्यात यावी व योजनांची कालबद्ध अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी संबंधित अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांची राहील.

७. या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेले अनुदान ज्या बाबींसाठी खर्च करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे, त्याच बाबींसाठी खर्च करावे व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता संबंधितांनी घ्यावी.

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २५७/अर्थोपाय, दिनांक १९/०७/२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२३१६२१३१८१२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Shivaji Jadhav

Digitally signed by Santosh Shivaji Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f635bf4a671627c02b82e6a01acb4a38afc24f58a5534a9d1271fe258a564b0, serialNumber=b8ee819ccc335cea98640b72c63671dd013899d3601f09ce4ea340e1741652a0, cn=Santosh Shivaji Jadhav
Date: 2019.07.23 16:34:37 +05'30'

**( संतोष जाधव )**
**कार्यासन अधिकारी**

**प्रत,**

१. मा. मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव, आदिवासी विकास यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
५. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे

६. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
८. सहसचिव /उपसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
९. अपर आयुक्त,आदिवासी विकास,ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर.
१०.अवर सचिव, भारत सरकार, जनजाती कार्य मंत्रालय, शास्त्री भवन, नवी दिल्ली.
११.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२.सर्व प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
१३.नियोजन विभाग/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.अवर सचिव/ कार्यासन अधिकारी , का-६, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.